Sakal , Pune Today, Date : 02.09.2011 , Page 6

# भ्रष्टाचाऱ्यांना जाब विचारणारी यंत्रणा येईल

## नागरिक चेतना मंचतर्फे आयोजित लोकपालविषयक व्याख्यानात डॉ. अभय फिरोदिया यांचे मत

**पुणे, ता. १ :** "जनलोकपाल कायदा काही दिवसांतच अस्तित्वात येईल व जादूची कांडी फिरल्यासारखा भ्रष्टाचार नाहीसा होईल, असा समज करून घेणे चुकीचेच आहे; पण जनलोकपालामुळे भ्रष्टाचारी लोकांना जाब विचारणारी यंत्रणा तरी अस्तित्वात येईल. लोकप्रतिनिधींनी सक्षम लोकपाल कायदा बनविणे हाच आपल्या देशातील नागरिकांचा खरा विजय ठरेल," असे मत मराठा चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज अँड ॲग्रिकल्चरचे अध्यक्ष डॉ. अभय फिरोदिया यांनी बुधवारी येथे व्यक्त केले.

संसदेतील खासदारांचा अवमान केल्याच्या आरोपावरून प्रसिद्ध अभिनेते ओम पुरी व निवृत्त पोलिस अधिकारी किरण बेदी यांच्यावर कारवाई करणे हे लोकभावनेच्या विरोधात जाणारे ठरेल व ती चूक राजकारणी करणार नाहीत, असेही त्यांनी नमूद केले.

जनलोकपाल मसुदा व नुकत्याच झालेल्या जनआंदोलनावर नागरिक चेतना मंचाच्या वतीने आयोजित व्याख्यानात फिरोदिया यांनी आपली मते मांडली. या प्रसंगी मंचाचे अध्यक्ष निवृत्त मेजर जनरल एस. सी. एन. जठार, महासचिव बी. डी. शर्मा, सचिव संजीव मेहता आदी उपस्थित होते.

फिरोदिया म्हणाले, "अण्णा हजारे यांनी पुकारलेल्या जनआंदोलनात खऱ्याअर्थाने तळागाळातले नागरिक सहभागी झाले होते. सत्ता आणि ताकद म्हणजे पैसा, व्होट बँक, राजकीय वजन हे समीकरणच चुकीचे ठरवून खरी ताकद ही नैतिक मूल्यांपासूनच येते, हे अण्णांनी दाखवून दिले. सरकारी बाबूंकडून मिळणाऱ्या गुलामासारख्या वागणुकीतून सामान्य माणसाच्या मनात राग साठलेला होता. या रागानेच सर्व लोकांना एकत्र आणले."

"संसदेत अनेक चांगले खासदार आहेत व त्याचबरोबर गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेले काही वाईट लोकही आहेत. या वाईट लोकांवर टीका करताना चांगल्या लोकांना त्याचा त्रास होणार नाही, याची काळजी घेतली पाहिजे. ओम पुरी व बेदी यांच्यावर संसदेचा अवमान केल्याच्या आरोपावरून कारवाई करणे हे लोकभावनेच्या विरोधात जाणारे ठरू शकते व ती चूक राजकारणी करणार नाहीत. सक्षम लोकपाल कायदा बनवून देशवासीयांच्या भावनेचा आदर राजकारण्यांनी करणे हाच सर्व नागरिकांसाठी खरा विजय ठरेल," असे फिरोदिया म्हणाले.



**पूना क्लब :** नागरिक चेतना मंचच्या वतीने बुधवारी आयोजित कार्यक्रमात 'जनलोकपाल' या विषयावर व्याख्यान देताना डॉ. अभय फिरोदिया. (डावीकडून) बी.डी. शर्मा, एस.सी.एन. जठार, संजीव मेहता व फिरोदिया.